सत्यमेव जयते

# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)
"शिक्षण-नव्हेव्यवसाय-ज्ञान यज्ञ"

शासकीय तंत्र निकेतन इमारत,
रुम नं. ३०५, ३ रा मजला, खेरवाडी,
बांद्रा, मुंबई-४०००५१

E-mail: fra.govmh@gmail.com
Website: www.mahafra.org
दुरध्वनी: ०२२-३१९८०३४८
८८२८७८६२६४

क्रमांक : शुनिप्रा/नियंत्रण शाखा/963/२०२४ दिनांक : 2/8/24

## सूचना

महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय / उच्च व तंत्र शिक्षण / विधी /कृषी या विभागांतर्गत प्राधिकरणाच्या अधिपत्याखाली तसेच प्राधिकरणाच्या कक्षेत येणाऱ्या विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांना या सूचनेद्वारे असे निदर्शनास आणून देण्यात येते की,

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील -

"कलम १४(च) (४) नुसार प्रत्येक विनाअनुदानित संस्था, नियामक प्राधिकरणाने मान्यता दिलेले पाठयक्रमनिहाय शुल्क आपल्या सूचना फलकावर आणि आपल्या संकेतस्थळावार मराठी व इंग्रजीमध्ये प्रदर्शित करील, परंतु, भाषिक अल्पसंख्यांक संस्थांच्या बाबतीत, अशी संस्था ज्या अल्पसंख्यांक भाषेशी संबंधित असेल त्या अल्पसंख्यांक भाषेतही ते शुल्क प्रदर्शित करील आणि ते विद्यार्थी व संस्था यांच्यावर बंधनकारक असेल."

त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक शुल्क किती आहे याची माहितीी सुलभ होण्याकरीता कायद्याच्या कलमांचे काटेकोरपणे पालन करावे.

उपरोक्त कलम १४ (च) (४) नूसार आपल्या संस्थेने प्राधिकरणाने निर्धारीत केलेले शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चे शुल्क संस्थेच्या सूचना फलकावर आणि संकेतस्थळावर प्रदर्शित केल्याचा अनुपालन अहवाल सूचनेच्या दिनांकापसून या कार्यालयात ३ दिवसांच्या आत सादर करावा. सदर मुदतीत अनुपालन अहवाल सादर न केल्यास कायद्याच्या कलम २० नूसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

मा. अध्यक्ष, यांच्या आदेशानूसार.

(शिक्का: शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई — सत्यमेव जयते — महाराष्ट्र राज्य)

अवर सचिव
शुल्क नियामक प्राधिकरण
मुंबई